श्री साईनाथ प्रसन्न.

# श्री साईलीला

मासिक पुस्तक.

वर्ष ९ अंक ७] आश्विन [शके १८५४

नलिनीदलगत जलमतितरलम । तद्वज्जीवनमतिशय चपलम



क्षणमपि सज्जनसंगतिरेका । भवति भवार्णव तरणे नौका

—शंकराचार्य.

संपादकः—रामचंद्र आत्माराम तर्खड.

# अनुक्रमणिका.


| | |
|---|---|
| विनंति ... ... ... ... ... ... | १—२ |
| मेलेला मनुष्य सहा तासांनीं जिवंत झाला ... ... | ३ |
| अनुभव ... ... ... ... ... ... | ४—५ |
| श्रीसभामंडप फंड ... ... ... ... ... | ६—७ |
| श्रीकायमनिधि फंड ... ... ... ... ... | ७ |
| आधुनिक पाश्चात्य शास्त्रप्रवीणांना प्रश्न ४ था ... ... | ८-१४ |
| पुण्यतिथी उत्सव ... ... ... ... ... | १५ |
| उत्सवाचा कार्यक्रम ... ... ... ... ... | १६ १८ |
| श्रीकायमफंडखातें ... ... ... ... ... | १९-२२ |
| श्रीभक्तमंडळखातें ... ... ... ... ... | २२ |
| अमृतानुभव संस्कृत समश्लोकी ... ... ... | १-१ |


## विनंति.

सुप्रसिद्ध श्री. मोरोपंत कविकृत **केकावलि** या भक्तिरसप्रेमामृतानें ओथंबलेल्या काव्यावर कै. रा. ब. दादोबा पांडुरंग यांची " यशोदा पांडुरंगी " टीका जी साठ वर्षांपूर्वी छापून प्रसिद्ध झाली होती व आजमितीस अत्यंत दुर्मिळ झाली होती- तिची दुसरी आवृत्ति छापून तयार झाली आहे. किं. रु. २.

कै. गोविंदराव रघुनाथ दाभोळकर यांचा सुप्रसिद्ध ओजस्वी व प्रासादिक श्रीसाईसच्चरित हा ग्रंथ बांधून तयार आहे. पानें अदमासें १०००. किं. रु. २—८—०. फक्त २५ प्रति शिल्लक आहेत. त्या संपल्यानंतर पहिल्या ३०० पानांचें पुनर्मुद्रण करून किंमत रु. ५ निरुपायानें ठेवावी लागेल.

**रा. आ. तर्खड.**

व्यवस्थापक—**श्रीसाईलीला कचेरी.**

## श्रीसाईभक्तांस विज्ञप्ति.

कोणाला श्री साईमहाराजांबद्दलचे त्यांचे स्वतःचे अनुभव श्री साईलीलेंत प्रसिद्ध व्हावे म्हणून पाठविण्याचे असतील त्यांनीं ते आमचेकडे पाठविल्यास ते प्रसिद्ध होण्याबद्दल आदरपूर्वक योग्य तो विचार होईल.

रा. आ. तर्खड,

—प्रकाशक.

# श्रीसाईनाथ प्रसन्न

श्री. रा. रा. बाबासाहेब यांस कृतानेक सा. नमस्कार वि. वि.

खालील विनंतीचा आपण स्वत: श्रीसाईलीलेचे संपादक या नात्यानें विचार करून योग्य वाटल्यास श्रीसाईलिलेच्या अंकांत सवडीप्रमाणें प्रसिद्ध करणें.

श्रीसाईबाबा महाराज शिरडी येथें प्रत्यक्ष असतांना त्यांच्यासंबंधीं किती एक लोकांना, व्यवहारिक व पारमार्थिक अनुभव व ज्ञान चांगलेंच प्राप्त झालें. अर्थात त्यांचे सर्वत्र ठिकाणीं भक्त दिसून येऊं लागले. श्रीसाईबाबांनीं आपल्या प्रत्येक भक्ताला निरनिराळा अनुभव दिला त्यांत शंका नाही. व त्याजबरोबर नवविधा भक्तिचें ज्ञानही प्रत्येकाच्या योग्यतेप्रमाणें दिलें. आज श्रीसाईबाबा आपणास आपल्या अंधज्ञानामुळें प्रत्यक्ष दिसत नाहींत. तथापि त्यांचें वास्तव्य श्रीक्षेत्र शिरडी येथें कायमचें आहे. त्याबद्दल कोणीही संशय घेण्याचें कारण नाहीं.

याबद्दल कोणीही साईभक्त अगर इतर गृहस्थ शिरडीस श्रीसाईबाबांच्या समाधीच्या वसतिस्थान द्वारकामाईच्या दर्शनास गेल्यानंतर, त्याच्या मनाची स्थिती तावडतोब बदलून आत्म्याला क्षणैक का होईना, परंतु शांतता प्राप्त होते. हा अनुभव प्रत्येकाला आहेच.

श्रीसाईबाबा संस्थान कायमफंडाची जरूरी किती आहे हें मी प्रत्यक्ष सांगण्याचें कारण नाहीं. त्याबद्दल संस्थानचे चिटणीस, खजिनदार व इतर कार्यकारी मंडळ योग्य ती मेहनत व योजना करीत आहेत व त्यांच्या श्रमांचे सार्थकही होत आहे, हें पाहून प्रत्येक श्रीसाईभक्ताला आनंद होत आहे. परंतु मी एक गरीब श्रीसाईबाबांचा बालक माझ्या बुद्धीप्रमाणें नम्र विनंति करीत आहे ती अशी:—

श्रीसाईबाबांच्या प्रत्येक भक्तानें आपल्या नेहमींच्या जरूरीच्या खर्चा-बरोबर दररोज पाव आणा श्रीसाईबाबांच्या कायमफंडाकरितां खर्चीं टाकावा. असें केल्यानें श्रीसाईबाबांची सेवा केल्यासारखें होणार आहे. कारण श्रीक्षेत्र

शिरडी येथें श्रीसाईबाबांच्या मंदिरांत जी नित्यनैमित्तिक कार्यें होतात त्यांचा सर्व खर्च कायमफंडामार्फत होत असतो.

श्रीसाईबाबा यांनीं आपल्या पश्चात् या कामाकरितां कांहींही योजना केली नव्हती, कारण ते पूर्ण विरक्त होते.

आतां माझी सर्व साईभक्तांस नम्र विनंति आहे कीं, प्रत्येकानें दररोज सकाळीं अगर सायंकाळीं, श्रीसाईबाबांच्या नांवानें एखाधा लहान पेटींत अगर पिशवींत पाव आणा ठेवीत जावा; असें केल्यानें सहज रीत्या वर्षाअखेर सहा रुपये जमा होतील व ते कायमफंडाला सहज कायमपणा आणून देतील.

जमलेले पैसे संस्थानचे खजिनदार यांच्याकडे दरमहा अगर तिमाही, जसें ज्यांस सवडीचें होईल तशा रीतीनें पाठविण्याची मेहरबानी करावी. संस्थानचे हल्लींचे खजिनदार फार योग्य व मेहनती आहेत. अशा कामीं ते प्रत्येकाला शक्य ती मदत करतील अशी माझी पूर्ण खात्री आहे. या योजनेप्रमाणें ज्याला करण्याची इच्छा होईल त्यानें शक्य तर या येत्या दसऱ्यापासून (श्रीसाईबाबांचे पुण्यतिथीपासून ) सुरुवात करावी; कारण हा सुमुहूर्त चांगला आहे.

आपला नम्र,

**नरहर दिनकर फाटक.**

ता. कलमः—

वर सुचविलेल्या योजनेप्रमाणें मीं स्वतः तारीख १-७-३२पासून सुरवात केली आहे व जमलेले दोन महिन्यांचे पैसे-एक रुपया-सोबत पाठवीत आहें, तो कायमफंडखातीं जमा करावा

---

श्री. नरहर दिनकर फाटक यांची सूचना सहजसाध्य व गोड परिणामकारक आहे हें उघड आहे. —संपादक.

# मेलेला मनुष्य ६ तासांनीं जिवंत झाला।

ही हकीगत तारीख १७ च्या फ्रीप्रेसमध्यें व दुसऱ्या इंग्रजी, मराठी वर्तमानपत्रांतून प्रसिद्ध झाली आहे. फ्रीप्रेसमध्यें इंग्रजींत दिलेल्या हकीकतीचें भाषांतर खालीलप्रमाणें आहे.

लाहोर जिल्ह्यांतील गोवालमंडी गांवामध्यें तेजु नांवाचा एक रहिवासी बरेच दिवस आजारी होता. मंगळवारीं डाक्टरलोकांनीं त्याची तब्येत अगदीं निराशाजनक आहे असें सांगितलें व मध्यरात्रीच्या सुमारास तो मेला. त्यानंतर त्याच्या नातलगांनीं त्याला उचलून जमिनीवर आणून ठेविलें आणि त्यातील बाया त्याच्या प्रेताजवळ सर्व रात्र रडत बसल्या. सहा तासांनंतर सकाळीं त्याचे प्रेत तिरडीवर ठेवितांक्षणीच तो राम राम म्हणत उठून बसला आणि त्याच्याजवळ असलेल्या मंडळीना त्यानें सांगितलें कीं मला स्वर्गांत घेऊन गेले व तेथें गेल्यानंतर पाहिजे असलेला मनुष्य तूं नव्हेस,तूं बाकीचें आयुष्य साधू-प्रमाणें घालीव असें देवांनीं सांगितलें. त्याप्रमाणें तेजूनें लागलीच भगवीं वस्त्रें धारण केली.

अंधेरी. विनायक आपाजी वैद्य.

श्रीसद्गुरुसाईनाथ प्रसन्न

# अनुभव

कृतानेक साष्टांग नमस्कार विनंति विशेष:—

खालील अनुभवास श्रीसाईलीला मासिकाच्या एखाद्या अंकीं प्रसिद्धी-करितां जागा मिळेल अशी आशा आहे.

मला आजपर्यंत श्रीसद्गुरू साईबाबांचे अनेक अनुभव आलेले आहेत, त्यांपैकीं एक खालीं देत आहें.

माझा धाकटा मुलगा चि. पद्माकर याला गेल्या जुलई महिन्याच्या अठ्ठावीस तारखेस पडशासारखें होऊन प्रथम ताप आला. दुसऱ्या दिवशीं लगेच तब्यत दाखवून औषध आणलें. ताप पडशामुळें आला असल्यामुळें दोन दिवसांचें औषध आणलें. परंतु हा ताप कमी न होतां वाढतच चालला.

ता. १-८-३२ रोजीं म्हणजे तापाच्या दिवसांपासून पांचव्या दिवशीं ताप अतिशय वाढला व डोळ्यांस मेट, अंगावरील दूधही पीत नाहींसा झाला. त्याच-प्रमाणें लघवी साफ होत नसल्यामुळें पोटही बरेंच फुगलें. मनास फारच धास्ती वाटूं लागली. शेवटीं संध्याकाळीं चार वाजतां डॉक्टरसाहेब यांना घरीं आणून त्याची तब्यत दाखविली. त्या वेळीं ताप ३॥ होता. रीतीप्रमाणें डॉक्टरसाहेब यांनीं औषध दिलें व इतर उपचार करण्यास सांगितलें. मुलाचें वय अवघें चार महिन्यांचें असल्यामुळें शेक वगैरे उपचार करणें हेंही फारच सावधगिरीनें करणें भाग पडलें.

आमच्या कुटुंबांतील मुलांवाळांची श्रद्धा श्रीसाईबाबांवर असल्यामुळें कोणास कांहीं झालें म्हणजे श्रीसाईबाबांच्या समाधीपुढील उदी लावणें व उदी पाण्यांत अगर औषधांत घालून देणें हें चुकत नसे. त्याप्रमाणें ताप आल्या दिवसापासून उदी लावणें व उदी औषधांत घालून देणें सुरूच होतें.

मी पांचव्या दिवशीं संध्याकाळीं श्रीसाईबाबांच्या तसबिरीसमोर उभा राहून नमस्कार करून मुलांस सांभाळणें आपल्या स्वाधीन आहे, मुलगा

चांगला झाला असतां आमच्यावर अनंत उपकार होतील, वगैरे अनेक प्रकारें श्रीचा धांवा केला. त्याचप्रमाणें श्रींसमोर बसून श्रीसाईलीला मासिकांतील जुने अंक घेऊन त्यांतील अनुभव व अध्याय वाचले. रात्रीं मुलास चांगली झोंप लागळी, परंतु ताप कायम राहिला. पुढें दुसऱ्या दिवशीं ताप साधारण कमी झाला व पहिल्यापेक्षां थोडा आराम वाटला. तिसऱ्या दिवशीं पुन्हा तब्यत दाखविण्याकरतां डॉक्टरसाहेब यांस आणलें, तेव्हां ताप पहिल्यापेक्षां बराच कमी होता.

याप्रमाणें ताप कमी होत जाऊन नवव्या दिवसापासुन मुलाला बराच आराम वाटला. दररोज उदी सुरूच होती व मनांत श्रीसाईबाबांस आळवीत होतों.

याप्रमाणें दिवसेंदिवस तब्यत सुधारत जाऊन मुलगा साफ बरा झाला. "मुलगा बरा झाल्यावर उदीबद्दलचा अनुभव प्रसिद्धीकरितां पाठवीन" असें श्रीसाईबाबांच्या समोर कबूल केलें होतें व त्याप्रमाणें हा अनुभव पाठविला आहे.

एकंदरीनें "श्रीसाईबाबा व त्यांची उदी" यांच्यावर पूर्ण श्रद्धा होती त्यामुळें मुलगा पदरांत पडला. किती अनंत उपकार श्रीसाईबाबांचे ! ... त्यांच्या अगाध लीलेची !

पालघर ता. १६-९-३२. **यादव विठ्ठल म्हात्रे**, तलाठी.

---

वरील अनुभव प्रसिद्ध करण्यांत साहजिक अत्यंत आनंद वाटत आहे. आणि असेच अनुभव वारंवार प्रसिद्ध करून श्रींच्या लीलेविषयींचें प्रेम द्विगुणित करावें अशी श्रींच्या सर्व बालगोपालांस सविनय प्रार्थना करण्यांत येत आहे.

—संपादक.

# श्री सभामंडप फंड हस्ते श्री दासगणू महाराज

| | | | |
|---|---|---|---|
| १ | पूर्वी जमा झालेले | | २२८-०-० |
| ३ | श्री. गो. का. गाडगीळ | पुणें | ११-०-० |
| ४ | ,, गंगाधर गणेश महाजनी | ,, | ११-०-० |
| ५ | ,, शंकर गणपत शिंदे | ,, | ११-०-० |
| ६ | ,, मुकुंद गणेश मिरजकर शास्त्री | ,, | ५-०-० |
| ७ | ,, रामचंद्र हरी ढमढेरे | ,, | ११-०-० |
| ८ | सौ. जानकीबाई रामचंद्र ढमढेरे | ,, | ११-०-० |
| ९ | गं. भा. सोनुताई गाडगीळ | ,, | ५-०-० |
| १० | ,, द्वारकाबाई साठे | ,, | ५-०-० |
| ११ | श्री. गोविंद काशीनाथ करंबेळकर | ,, | ५-०-० |
| १२ | ,, गोविंद लक्ष्मण पाठरे | ,, | ११-०-० |
| १३ | ,, रामचंद्र गंगाधर महाजनी | ,, | ५-०-० |
| १४ | ,, बापुराव राघवजी बोरावके | शिरडी | २१-०-० |
| १५ | ,, रघु पाटील शिंदे | ,, | ३-०-० |
| १६ | ,, शंकर आपा पाटील शिंदे | ,, | २-०-० |
| १७ | ,, माधव कानू फसले | ,, | ३-०-० |
| १८ | ,, तात्या पाटील शिंदे | ,, | २-०-० |
| १९ | ,, बयाजी आपाजी पाटील कोते | ,, | ५-०-० |
| २० | ,, त्रिंबक गणपती महाराज खंदारकर | ,, | २-०-० |
| २१ | ,, तात्याजी गणपतराव पाटील कोते | ,, | १६-०-० |
| २२ | ,, वामन माणकू गोंदकर पाटील | ,, | ५-०-० |
| २३ | ,, विठोबा नारायण कुंभार | ,, | २-०-० |
| २४ | ,, लक्ष्मण कचेश्वर जाखडी | ,, | २-०-० |
| २५ | ,, बाळा पिलाजी गुरव | ,, | २-०-० |
| २६ | ,, माधवराव बळवंत देशपांडे | ,, | २-०-० |
| २७ | ,, हणमंत शिवराम गोंदकर | ,, | ३-०-० |
| २८ | ,, मोहनीराज सखाराम महाजन | ,, | ५-०-० |
| २९ | ,, बयाजी लक्ष्मण कुळकर्णी | ,, | ३-०-० |
| ३० | ,, दगडू शिवराम सोनार | ,, | २-०-० |
| ३१ | ,, बाळा काशीराम शिंपी | ,, | २-०-० |
| ३२ | ,, बाबुराव सखाराम गोंदकर | ,, | १-०-० |
| ३३ | ,, तळवलकर साहेब इरिगेशन ओव्हरसियर | ,, | ५-०-० |
| ३४ | ,, रामचंद्र आनंदराम उर्फ कुचरू शेठ | ,, | २-०-० |
| ३५ | ,, मथू न्हावी | ,, | २-०-० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३६ | ,, | जव्हारमल तुकाराम | ,, | ५-०-० |
| ३७ | ,, | पुनमचंद भागचंद सेठ | ,, | ११-०-० |
| ३८ | ,, | इंद्रभान खिवराज सेठ | ,, | ६-०-० |
| ३९ | ,, | अमोलक राजरूप सेठ | ,, | २-०-० |
| ४० | ,, | जयराम नाना पाटील कोते | ,, | २-०-० |
| ४१ | ,, | गंगाधर बाळा सोनार | ,, | २-०-० |
| ४२ | ,, | बाळा कोंडीबा बोरकर | ,, | ३-०-० |
| ४३ | ,, | उमाजी भिकाजी शेळके | ,, | ५-०-० |
| ४४ | ,, | संताजी भिरशेत पा. शेळके | ,, | ५-०-० |
| ४५ | ,, | त्रिंबक सखाराम शेळके | ,, | ११-०-० |
| ४६ | ,, | शंकर दगडू कोते | ,, | २-०-० |
| ४६ | ,, | तुकाराम पांडू कोते | ,, | २-०-० |
| ४८ | ,, | मार्तंड म्हाळसाकांत भगत. | ,, | २-०-० |
| ४९ | ,, | पुरुषोत्तम रामचंद्र ओक | जळगांव | ५-०-० |
| ५० | ,, | रामचंद्र गणेश खेंद्रे | ,, | २-०-० |
| ५१ | ,, | वामन काशीनाथ चांदोरकर | ,, | २-०-० |
| ५२ | ,, | नारायण हरी आत्मसिद्ध | ,, | ३-०-० |
| ५३ | ,, | व्यवस्थापक गणेश उत्सव मंडळ, रेल्वे स्टेशन | ,, | ११-०-० |
| ५४ | ,, | विनायक दामोदर ढोंगळे | ,, | २-०-० |
| ५५ | ,, | काशीनाथ विष्णू तारे वैद्य | ,, | २-०-० |
| ५६ | ,, | गजानन दामोदर जोशी | ,, | ५-०-० |
| ५७ | ,, | नारायण दामोदर पिंगळे | ,, | २-०-० |
| ५८ | ,, | पुरुषोत्तम बाळकृष्ण कुळकर्णी | ,, | २-०-० |
| ५९ | ,, | सखाराम गणेश सरनाईक | ,, | २-०-० |
| ६० | ,, | कृष्णाजी बाजीराव किन्हीकर | ,, | २-०-० |
| ६१ | ,, | गोविंद मार्तंड पोळ | ,, | २-०-० |
| ६२ | सौ. | शांताबाई विनायक वैद्य | ,, | ११-०-० |

एकंदर रुपये ३२७-०-०

## श्री कायमनिधी फंड हस्तें श्री दासगणू महाराज

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ | श्री. | बापुराव राघवजी बोरावके | शिरडी | ४-०-० |
| २ | ,, | बाळा कोंडीबा बोरकर | ,, | २-०-० |
| ३ | ,, | तात्याजी गणपतराव पाटील कोते | ,, | २-०-० |

एकंदर रुपये ८-०-०

वांद्रें,
ता. २६-९-३२.

**रा. आ. तर्खड,**
आ. खजिनदार
श्रीसाईबाबा शिरडी संस्थान

# आधुनिक पाश्चात्य शास्त्रप्रवीणांना प्रश्न ४ था

श्री. संपादक महाशय यांस सा. न. वि. वि

थोडया दिवसांमागें एका आधुनिक शास्त्रप्रवीण मित्राबरोबर एका गृहस्थाचा संवाद लेखकानें साक्षीरूपानें ऐकला, तो आपणांकडे लिहून पाठवीत आहे.

गृहस्थ म्हणाला:—“ अहो ! अंकगणितशास्त्र तें काय आहे हो ?”

मित्र:—“अहो ! काय चमत्कारिक प्रश्न विचारतां ? एक, दोन, तीन वगैरे अंकांवरून रचलेलें गणितशास्त्र, तें अंकगणितशास्त्र.”

गृहस्थ:—“पण त्याची उत्पत्ति ?”

मित्र:—“मनुष्यप्राणी रानटी स्थितींतून जसजसा पुढें पुढें पाउलें टाकीत आला, तसतसें त्याला प्रथम दर्शनीं **आकाश, वायु** (भयंकर तुफानें वगैरे ), **तेज** ( सूर्य, चंद्र, विद्युत्, अग्नि, रात्रीं दिसणारे तारे, तारिका वगैरे ) **जलरूप** समुद्र, नद्या, पर्जन्यवृष्टि, आणि शेवटीं **पृथ्वी** ( लहानमोठे पर्वत, दऱ्या, मैदानें, वनस्पति व फळादियुक्त, अथवा रेताड व रूक्ष, त्याचप्रमाणें तिला होणारे धरणीकंप वगैरे आघात ) या **पंच महाभूतांच्या** खेळांकडे त्याचें साहजिक लक्ष जाऊन, त्या सर्व प्रचंड शक्तींच्या सानंद अथवा भीतियुक्त प्रसंगांचे जसजसे त्याला निरनिराळ्या प्रकारचे अनुभव येत गेले तसतसा तो आपल्या मानसशक्तींचा त्या द्वारें विकास करूं लागला, हें खरें ना ?”

गृहस्थ:—“असें मानावयास हरकत दिसत नाहीं.”

मित्र:—“पुढें गिरिकंदरांत आपल्या कुटुंबासह अथवा आपल्यासारख्या समुदायांसह राहात असतां मुख्य गोष्ट चरितार्थाची असल्यामुळें, आणि चरितार्थाचीं साधनें कंद, मूळ व फळें वगैरे सर्व काळीं, सर्व वेळीं मिळण्यासारखीं नसल्यामुळें, तसेंच शत्रूंच्या हल्ल्यांपासून आपल्यावर अवलंबून असणाऱ्या अबला व मुलेंबाळें या सर्वांच्या निर्वाहासाठीं योग्य त्या वस्तूंचा संग्रह करण्याची त्याला जरूर वाटून, तो त्याप्रमाणें व्यक्तिगत अथवा सामुदायिक प्रमाणांनीं संग्रह करूं लागला. हें जमिनीच्या जुनाट थरांत सांपडलेल्या त्याच्या अस्थि व त्यांसोबत असलेल्या गारगोटयांचीं हत्यारें व इतर सामुग्री यांवरून दिसून येतें.”

गृहस्थः—"प्रचलित बँकांचे व्यवहार, व दुबळ्या जनतेवर आक्रमण करणाऱ्या आधुनिक संस्थांचा हा पायाच तर !!"

मित्रः—तो हंसत बोलला, "असें दिसतें खरें ! Survival of the fittest (अक्कलयुक्त शरीरसामर्थ्यवान् असेच प्राणी उत्क्रांतितत्त्व विचारांप्रमाणें जगूं शकतात). असो. याप्रमाणें सर्व बिकट परिस्थितींतून झगडत असतां, आणि वर सांगितल्याप्रमाणें संग्रह करीत असतां, त्याला सर्व बाजूंनीं अंकगणितशास्त्राची गरज पडली, आणि त्या शास्त्राची उभारणी त्यानें आपल्या हातांच्या बोटांवरून सुरू केली असावी. हा एक मोठा फरक मनुष्य आणि इतर प्राणी यांमध्यें दिसून येतो."

ग्रहस्थः—"कधीं कधीं आपण सर्कशीमध्यें कुत्रे, घोडे यांना आंकडे ओळखतांना पाहातों तें कसें ?"

मित्रः—"तें बहुधा कृत्रिम असतें, निरनिराळे वास अथवा सरतें शेवटीं चवदावें रत्न, याचाच तो परिणाम असतो ! क्वचित् एखादें जनावर थोडे आंकडे मोजण्याइतकें अक्कलवान निघतें."

अद्यापि आस्ट्रेलिया देशांत पांचांपेक्षां जास्त अंक मोजतां येत नाहींत अशीं हजारों मनुष्यें आहेत !

गृहस्थः—"अहो आपण बोलतां तें सर्व भूगर्भशास्त्राधारें (geology) तसेंच आधुनिक मानव उत्क्रांतिशास्त्राधारें खरें आहे असें दिसतें; तरी एका गोष्टीविषयीं समजूत होत नाहीं. तुमचें गणितशास्त्र खोटें. अगदीं साफ खोटें आहे !"

मित्रः—"अहो ! तुम्ही म्हणतां तरी काय ? गणितशास्त्र खोटें ! ही कसली थट्टा"

ग्रहस्थः—"थट्टा ! थट्टा मुळींच नाहीं ! कोणतीही गोष्ट खरी असायाला तिला आधार पाहिजेना ? चक्षुर्वैसत्यम् असा आधार पाहिजेना ? श्रीलीलेंत दोन वर्षांमागें वर्णन केलेल्या इसमाला आपलीं स्वतःचीं दोन बोटें दिसतात त्याप्रमाणें अनंतकोटि ब्रम्हांडाचा नायक साक्षात् दिसलाच पाहिजे अशी

आपली चिकित्सापद्धति ना? त्याच पद्धतिच्या आधारानें आपणास निक्षून सांगतों कीं आपलें अंकगणितशास्त्र सर्वस्वीं खोटें आहे!"

मित्रः—"आपण काय बोलतां तें कळत नाहीं. स्पष्ट बोला कीं?"

गृहस्थः—"सर्व गणितशास्त्रांना आधार अंकगणित. अंकगणितशास्त्राला आधार?

मित्रः—"म्हणजे? एक, दोन, तीन, चार, वगैरे आंकडे!"

गृहस्थः—"जरा दमानें घ्या! **एक** म्हणजे?"

मित्रः—"एक म्हणजे? अंक एक!"

गृहस्थः—"आतां तुम्ही काय समजतां तें मला कळत नाहीं! एक म्हणजे काय? तुम्ही एकाचा आंकडा मांडता तो कसा?"

मित्रः—"अहो! तें एक चिन्ह आहे. अंकगणितशास्त्राचा तो पाया आहे."

गृहस्थः—"पण त्या पायाला आधार काय? पहा? अतिपरिचयाची गोष्ट असली म्हणजे आपण त्याचा सूक्ष्म विचार करीत नाहीं, त्यांपैकींच अंक **एक** ही गोष्ट आहे.

मित्रः—"म्हणजे?"

गृहस्थः—"म्हणजे! ही **एक** केवळ कल्पित गोष्ट आहे. **एक** म्हणून जो आपण आंकडा मांडतों अथवा चिन्ह समजतों त्या आंकड्याला आधार निव्वळ **कल्पना!** हा सर्व कल्पनेचा खेळ आहे. **ढकलंगांन भाकडकथा.** या कल्पनासृष्टींच्या आधारावर मनुष्यानें अंकगणितशास्त्र उभारलें, त्या शास्त्रावरून इतर गणितशास्त्रें तयार झालीं, मनुष्यानें दूरदूरच्या वस्तूंचे वेध घेऊन ग्रहणादिकांचीं गणितें बिनचूक केलीं. इतकेंच नव्हे तर त्याच्या मानसिक प्रगतीला या कल्पित भावनेनें प्रचंड गति मिळाली आहे, हें खरें ना?"

मित्रः—"आश्चर्य! खरोखरीच हें एक मोठें आश्चर्य आहे!"

गृहस्थः—"पहा काय गम्मत आहे ती! मनुष्यानें केवळ कल्पनेनें **एक** ही गोष्ट शोधून काढली. पण कल्पनेच्या आधारावर रचलेली गोष्ट मानसशास्त्रा-

---

१. हाच सर्व आधुनिक विद्वान् व विदुषींना ४ था प्रश्न आहे.—संपादक.

धारें, स्वप्नवत् म्हणजें खोटी, आणि निराधार असें मानल्यावर मनुष्याचा सर्व व्यापार, रोजगार, बँका, देणें, घेणें, मोजमाप करणें, यंत्रें उभारणें, चालवणें वगैरे गणितशास्त्रांच्या आधारावर असलेल्या तमाम गोष्टी खोट्या व निराधार व स्वप्नसृष्टीच्या असेंच म्हणावें लागेल !!"

" पण आपणाला नित्योपयोगी व्यवहारातच नव्हे, पण आपल्या अस्तित्वाला, जीविताला, **एक** ही मूळ कल्पना **सत्य** मानल्याशिवाय चालावयाचें नाहीं."

मित्रः—"तुम्हीं कांहीं म्हणा, परंतु अंकगणितशास्त्र ज्याचा पाया **एक** आहे तें **सत्य** आहे; मग ती कल्पना असो कीं कांहीं असो. या विचारापासून माझें मन कालत्रयींही माघार घ्यावयाचें नाहीं."

**गृहस्थः**—"या तुमच्या दृढ विचारानें मला स्वभाविक आनंद होत आहे; पण 'चक्षुर्वैसत्यम्' या सिद्धांतापासून तुम्ही च्युत होत आहांत याचा विचार करावा. असो. आपण आतां गतकालाचें थोडें सिंहावलोकन करूं या.

"भूगर्भशास्त्रान्वयें वानरादि तत्सम प्राण्यांपासून मनुष्य हा निराळा होऊं लागला ही गोष्ट किती वर्षांपूर्वीची असावी ? "

मित्रः—"अंदाजानें दोनचार लक्ष वर्षांपूर्वींची असावी. "

गृहस्थः—"त्यानंतर स्वतःची उन्नति करीत करीत, म्हणजे आंकडे वगैरे मोजण्याचा त्याच्या बुद्धीचा विकास सुमारें किती वर्षांमागें जाहलाअसावा ?"

मित्रः—"अनुमानानें ४०००० हजार वर्षांमागें. "

गृहस्थः—"म्हणजे अंक मोजण्याची सुरवात. अथवा **एक** या गोष्टीचा पाया सुमारें चाळीस हजार वर्षांमागें मनुष्याच्या विचारशक्तीनें रचिला असला पाहिजे. "

मित्रः—"होय ? "

गृहस्थः—"म्हणजे, अंकगणितशास्त्रांतल्या **एकाचा** उगम त्या वेळेच्या सुमारास मनुष्यानें स्वकल्पनेनें केला. असें जरी प्रत्यक्ष झालें असलें तरी अंकगणितशास्त्रांतर्गत **एक** त्यापूर्वी होतें ? "

मित्रः—"होतें, जरूर होतें. "

गृहस्थः—"मनुष्याला गम्य ? "

मित्रः—"नाहीं, पण **एक** त्यापूर्वी होतें खास."

गृहस्थः—"त्यापूर्वी केव्हांपासून?"

मित्रः—"जगाच्या उत्पत्तीपासून."

गृहस्थः—"समजा, भयंकर स्फोट होऊन या पृथ्वीचा चुराचुरा झाला आणि मनुष्यादि सर्व प्राण्यांचा संहार झाला तर त्या '**एक**'चा नाश झाला पाहिजे!"

मित्रः—"नाहीं; त्याचा नाश होणें अशक्य!"

गृहस्थः—"तर मग हा गणितशास्त्रांतर्गत **एक अनादि** आणि **अनंत** आहे. मागें सांगितल्याप्रमाणें, आपल्या अस्तित्वाला, जीविताला **एक** ही कल्पना **सत्य** मानल्याशिवाय चालावयाचें नाहीं."

"तेंच **एक चैतन्यरूपानें** हें सर्व विश्व व्यापून आंत बाहेर सर्व ठिकाणीं ओतप्रोत भरलें आहे. तेंच आपणां सर्वांमध्यें सर्व प्रकारें परिपूर्ण रीतीनें वास्तव्य करून राहिलें आहे. तें आपली जाणीव इतर अनेक प्रकारां-प्रमाणें अंकगणिताचा **एक** या आपणच उत्पन्न केलेल्या कल्पनेनें आपणा स्वतःस 'चक्षुर्वैसत्यम्' या न्यायानें दृष्टोत्पत्तीस आणीत आहे. अंकगणितांतलें **एक** व त्यापासून उत्पन्न होणाऱ्या गणित शास्त्रांच्या सर्व शाखा हीं त्या '**एका**'**ची** माया. ही माया **नाहीं** म्हणावी तर **आहे**; कारण गणितशास्त्राधारें आपले सर्व व्यवहार चालत आलेले आपण सदोदित पाहत आहोंत. बरें, ती त्याची माया **आहे**, म्हणावें तर अंकगणितांतल्या '**एका**'ची सर्व उभारणी कल्पनासृष्टीवर आहे. आणि कल्पनासृष्टीवर उभारलेलीं विधानें खोटीं, म्हणजे शेख महंमदाचें राज्य, सबब **नाहीं**!"

---

१. Logic (लॉजिक) म्हणजे तर्कशास्त्र; याचा अभ्यास सन १८८१ म्हणजे ५१ वर्षांपूर्वी केला असल्यामुळें त्याचे सर्व सिद्धांत आज स्मृतिपथावर नाहींत, म्हणून श्री. "म्हातारा" यांनीं वरील प्रकारें केलेल्या विधानांवर कोणी विवेचन केल्यास, उपकार होतील.

—संपादक.

अशी सर्व मजा सहज विचारांअंतीं दिसून येते. मायावादानें ऊरफोड, डोकेंफोड करून घ्यावयाचें कारण राहत नाहीं. माया ही जगज्जननीची (Cosmic Energy) कशी लीला आहे ती अंकगणितांतलें एक उत्तम प्रकारें प्रतिपादन करतें.

ह्या **एका**च्या शोधनासाठीं आपल्या ऋषिमुनींनीं व साधुसंतांनीं प्रत्यक्ष अनुभव घेऊन छातीठोक रीतीनें आपल्या अवर्णनीय उपनिषदादिद्वारा सर्व जगाला जाहीर केलें आहे, कीं तें **एक चैतन्य रूपानें** सर्व ब्रह्मांड व्यापून तुमच्या आमच्या सर्वांच्या हृदयांत श्रीसाईबाबा म्हणतात त्याप्रमाणें "अरे! तुझें पोट फाडून मी त्यांत बसलों आहे रे!" तें एक **सत्य** शोधून, अनुभवून पाहावयाचे आहे. हेंच तें एक जें **"एकम् सत् विप्रा बहुधा वदंति"** तेंच तें **एक सत्य चैतन्य** रूपानें सर्व ब्रह्मांड आंत बाहेर व्यापून आहे. तेंच गणितशास्त्राचा पाया आहे, आणि तें **सत्य** आपली प्रचीति इतर रीतींप्रमाणें याही रूपानें आपणां सर्वांस साक्षात् दाखवीत आहे, तरी आपण पाहावयाची यत्किंचित् तरी तसदी घेतों काय?

**"ॐ तत् सत्"**

ता. ३०–८–३२ **"ध्रुवतारा"**

वरील लेखावरून श्रीसाईमाउलीच्या पायांजवळ पहिलेल्या एका गोष्टी-विषयीं लिहिल्याखेरीज राहवत नाहीं. कै. श्री. मेघा याला श्रींची आरति करतांना अनेकांनीं पाहिलें आहे. श्री. मेघा मध्यान्हीची आरति श्रींपुढें ओंवाळीत असे. तसें करतांना तो एका पायावर उभा राहून दुसरा पाय दुणून आपल्या उभ्या पायाच्या गुडघ्याचा त्याला आधार देत असे. आरति चांगली अर्धा पाऊण तास चालावयाची, पण कै. मेघा यानें अचल उभें राहावें. आम्हां सर्वांना या-विषयीं कौतुक वाटावें. आरति सुरू होण्यापूर्वी श्रींच्या आज्ञेप्रमाणें गांवांतल्या श्रीविठ्ठलाच्या व गांवाबाहेरील श्रीखंडोबा, शनि वगैरे सर्व देवांची पूजा करून नंतर मेघा श्रींच्या आरतिला येत असे. श्री. मेघा हा एक निस्सीम शिवो-पासक होता. आणि श्रीसाईबाबा हे श्रीशंकराचेंच रूप आहे अशी त्याची ठाम समजूत असून, त्याविषयीं त्याला अनेक दाखले मिळाले होते.

असो! आरति चालली असतां श्रीसाईमाउलीनें बसल्या बसल्या आपला उजवा हात किंचित उंच करून त्याची प्रथम अंगुली दाखवून तो हात आणि ती अंगुलि वर्तुलाकार फिरवावी. मेघानें त्यावेळीं माथें नमवून होकार दाखवावा. असें कधीं कधीं त्रिवार व्हावें. त्यानंतर श्रींनीं ती अंगुली, व हात वर्तुळाकार न फिरवितां, हात व अंगुलि स्थिर ठेवून, श्री. मेघा याला दाखवावी. श्री. मेघा यानें मस्तक नमवून होकार दाखवावा. नंतर श्रींनीं मधुर हास्य करून सर्वांकडे नजर फेंकून मेघा व आम्हां सर्वांस संतोषवावें.

श्री. मेघा याजला या खुणांविषयीं विचारतांना त्यानें सांगावें कीं, "प्रथम खुणेचा अर्थ 'तूं गांवांतल्या सर्व देवांची पूजा केलीस?' असें बाबा विचारीत असत. आणि नंतर जेव्हां हात स्थिर करून ते **एकच बोट** दाखवीत तेव्हां तीं दैवतें 'माझ्या शंकराचींच रूपें आहेत' असें मी समजतों" असें तो बोलत असे.

त्या वेळीं श्रींच्या दरबारांत कांहीं धूर्त जन असत; आपल्या स्वतः-पाशीं या खुणांचा अर्थ श्रीपरमेश्वराचें अस्तित्व सचराचर व्यापून आहे, आणि तो '**एकच**' आहे, याच्याच या खुणा आहेत असें ते समजत असत.

सारांश आरतिसारख्या मनोहर प्रसंगीं त्या कानठळ्या बसणाऱ्या प्रचंड घंटानादांत, नगाऱ्याच्या धबकाऱ्यांत, ताशाच्या आवाजांत व शेंकडों मनुष्यांच्या आरतिच्या जयघोषांत, ही अप्रतिम शिकवण, आरतिचें अंतिम रहस्य, ज्याच्यात्याच्या भावनेप्रमाणें श्रीसाईमाउली प्रत्येकाला पटवून देत असे.

किती तरी अवर्णनीय व परिणामकारक बाबांच्या इतर शिकवणींपैकीं ही शिकवण होती! तिची आठवण झाली असतां हृदय भरून येतें!!!

रा. आ. तर्खड,

चांद्रें, ता. ३१-८-३२. संपादक.

---

# श्रीसद्गुरुसाईबाबा



## पुण्यतिथीउत्सव

शिर्डी ता. १ सप्टेंबर १९३२.

कृ. सा. न. वि. वि. आधुनिक संतचूडामणि सच्चिदानंद श्रीसमर्थ सद्गुरु साईबाबामहाराज संस्थान शिर्डी, ता. कोपरगांव, जि. अहमदनगर यांची १४ वी पुण्यतिथी येत्या आश्विन शु.॥ १० शके १८५४ रविवार (ता. २-१०-३२) रोजीं श्रीक्षेत्र शिर्डी येथें महाराजांच्या मंदिरांत होणार आहे. तरी या समयीं आपण कृपा करून आपल्या कुटुंबांतील बाळ गोपाळांसह व मित्रमंडळीसह श्रींच्या तीर्थप्रसादास अवश्य यावें अशी नम्र विनंती आहे.

आपले नम्र साईदास,

मोरेश्वर विश्वनाथ प्रधान.
तात्याजी गणपत पाटील कोते.
बाळकृष्ण विश्वनाथ देव.
सखाराम बळवंत धुमाळ,
वासुदेव नारायण चांदोरकर,

सुंदरराव दि. नवलकर,
ऑ. चिटणीस.
साई भुवन, १४१ प्रिन्सेस स्ट्रीट, मुंबई.

रा. आ. तर्खड, ऑ. खजिनदार,
१० जर मॅन्शन, वांद्रें.

बापुराव रा. बोरावके,
ऑ. दुय्यम चिटणीस.

रघुवीर भा. पुरंदरे
ऑ. दु. खजिनदार.

श्रीसाईबाबा शिर्डी संस्थानचे
विश्वस्त. (ट्रस्टीज)

# उत्सवाचा कार्यक्रम

## आश्विन शु॥ ९ शके १८५४ शनिवार ( ता. ८-१०-३२ )

### उत्सवास प्रारंभ

पहांटे ५ ते ६ सनई चौघडयासह नित्य...माणें काकड आरती.

सकाळीं ६ ते ८ श्रींचे समाधीवर रुद्राभिषेक व समाधीपुढें सनई चौघडयाची नित्याप्रमाणें हजेरी.

९ ते १० श्रींचे समाधीस मंगलस्नान, वस्त्रपरिधान, षोडशोपचार पूजा, श्रींच्या प्रधान लेंडीबागेंतील पुष्पहार व तुळसी, दुर्वासमर्पण.

१० ते १२ श्रींचे समाधीपुढें श्री. बापाजी लक्ष्मण कुळकर्णी यांचें कीर्तन.

१२ ते १ दुपारची नैतिक आरती.

दुपारीं २ ते ३ ब्राह्मण व पाहुणे मंडळीचें भोजन.

३ ते ४ श्रींचे समाधीपुढें श्री. नानु पुजारी यांचें नैतिक पुराण.

५ ते ६ श्रींचे समाधीपुढें श्री. बाळा चोपदार यंचें नैतिक चक्री भजन.

सायंकाळीं ६ते७ सायंकाळची नैतिक आरती.

रात्रीं ८ ते ९ रथाची मिरवणूक व गारुड.

९ ते ११ नैतिक शेजारती व भजन.

## आश्विन शु॥ १० रविवार (ता.९-१०-३२) पुण्यतिथी दिवस

पहांटे ५ ते ६ वरप्रमाणे.

सकाळीं ६ ते ८ रुद्राभिषेक व पवमानाभिषेक.

सकाळीं ८ ते ९ भिक्षा.
९ ते ११ वर ९ ते १० प्रमाणें.
११ ते १ श्री. बाळासाहेब देव यांचें श्रीसाईबाबा पुण्यतिथी आख्यान, कीर्तन व दुपारची नित्य आरती.
दुपारीं १ ते २ पुण्यतिथी आराधनविधि.
२ ते ४ तीर्थप्रसाद भोजन.
४ ते ५ श्रींचे समाधीपुढें नैतिक पुराण.
५ ते ६ ,, ,, चक्री भजन, व शिर्डी संस्थान कार्यकारी मंडळाची सभा व सीमोल्लंघन.
संध्याकाळीं ५ते७ इतर मंडळीचें भोजन.
६ ते ७ सायंकाळची नित्य आरती.
रात्रीं ८ ते ९ पालखी व गारुड.
९ ते ११ शेजारती व भजन.

## आश्विन शु॥ ११ सोमवार (ता. १०-१०-३२)

पहांटे ५ ते ६ वरप्रमाणें.
सकाळीं ६ ते ७ रुद्राभिषेक वरप्रमाणें.
९ ते १० वरप्रमाणें.
११ ते १२ श्रींची नित्याप्रमाणें दुपारची. आरती
दुपारीं १२ ते २ फराळ व भोजन.
४ ते ५ श्रींचे समाधीपुढें श्री. बाळासाहेब देव यांचें पुराण.
सायंकाळीं ५ते६ ,, ,, चक्री भजन.
६ ते ७ सायंकाळची आरती.
रात्रीं ८ ते ९ रथाची मिरवणूक व गारुड.
९ ते ११ श्री. बापाजी कुळकर्णी यांचें कीर्तन, शेजारती व भजन.

## आश्विन शु॥ १२ मंगळवार (ता. ११-१०-३२) काला

| | |
|---|---|
| पहांटे ५ ते ६ | सकाळीं ६ ते ८ व ९ ते १० वर प्रमाणें. |
| सकाळीं ११ते१ | श्री. बापाजी कुळकर्णी यांचें काल्याचे कीर्तन. |
| दुपारीं १ ते २ | दुपारची आरती. |
| २ ते ३ | भोजन. |
| ४ ते ५ | श्री. बाळासाहेब देव यांचें ज्ञानेश्वरी.पुराण |
| ५ ते ६ | चक्री भजन. |
| सायंकाळीं ६ते७ | सायंकाळची नैतिक आरती. |
| ६ ते ९ | भंडारा भोजन. |
| रात्रीं ६ ते ११ | शेजारती व भजन. |

---

# श्री कायमफंड खातें

| | | | |
|---|---|---|---|
| १९३२ | | | रु. आ. पै. |
| एप्रिल | ८ | डॉ. श्रीपादराव शांतमूर्तराव डैकिणी, मियागांव | २-२-० |
| ,, | १० | श्री. बाबाजी आनंदराव मोहिले, पालघर | १-८-० |
| ,, | ,, | ,, आर. व्ही. पाटणकर, नाशीक | १-४-० |
| ,, | २० | सौ. उमाबाई देव श्रीविलास शिरा, एप्रिल | १-०-० |
| ,, | ,, | ,, ,, ,, पेटी, मार्च | २-०-० |
| ,, | ,, | श्री. रा. आ. तर्खड, शिरडी येथें लिलावांत आंगठीवगैरेचे | १५-८-० |
| ,, | २१ | ,, पा. ल. भागवत, कोईश्वा | ०-४-० |
| ,, | ,, | ,, के. अ. बेंद्रे, बारामती | २-०-० |
| ,, | ,, | ,, गणपतराव आत्माराम कीर्तिकर, खार | ५-०-० |
| ,, | ,, | ,, गणपतराव बोडस, हस्तें श्री. लक्ष्मीबाई जोगळेकर | ५०-०-० |
| ,, | ,, | मे. माणेकशाह होर्मसजी चंदनवाला, धोबीतलाव | ०-५-३ |
| ,, | ,, | श्री. विठ्ठल गेनु बारवे, क्राफर्ड मार्केट | १-४-० |
| ,, | ,, | ,, ए. जी. तळपदे, सोमनाथ लेन, वांद्रें | ०-१०-० |
| ,, | ,, | ,, लक्ष्मण गोविंद मुंगी, नाशिक | २-०-० |
| ,, | ,, | ,, गंगूताई चितळे, दर्यापूर वऱ्हाड | ४-१३-० |
| ,, | ,, | ,, गोटीराव जयराम गुराशी, कोपरगांव | २-०-० |
| ,, | ,, | मे. अबदुल हक्क C/o स्टूर्स कं. प्रॉडत्तूर | ५-०-० |
| ,, | ,, | श्री. सदाशिव आत्माराम पाटणकर, पोयबावडी | १-४-० |
| ,, | २३ | ,, गणपतराव आत्माराम कीर्तिकर, खार | ०-८-० |
| एप्रिल | २३ | श्री. मंजुबाई व्यवहारकर, झावबाचें घर | १-०-० |
| ,, | ,, | डॉ. व्ही. गो. हाटे, २२६४ भद्र अहमदाबाद | ३-०-० |
| ,, | ,, | श्री. सीताबाई आर. चोंणकर, कान्देरी रोड बोरिवली | २-४-० |
| ,, | ,, | ,, विठ्ठलरखुमाई मंदीर, चुंचाळें, चोपडें | ५-०-० |
| ,, | ,, | मे. फरदुनजी पेस्तनजी तवाडिया | १-०-० |
| ,, | २४ | श्री. दत्तात्रय मोरेश्वर सबनीस, दीक्षितवाडापार्ले, पूर्वी दिलेली रक्कम ४०+११०=१५० एकंदर | ११०-०-० |
| ,, | २५ | ,, श्रीधर मुकुंद दातार, अंधेरी | १-०-० |
| मे | २ | ,, संपतराव देशमुख, इंदूर | २-०-० |
| ,, | ४ | ,, आर. व्ही. पाटणकर, नाशीक | १-४-० |
| ,, | ५ | ,, नारायण नरसिंह फडणीस, जळगांव | ३-०-० |
| ,, | ८ | ,, यशवंतराव जनार्दन गाळवणकर, एप्रिल वांद्रें | ५-०-० |
| | | | २३६-६-३ |

| | | | रु. आ. पै. |
|---|---|---|---|
| १९३२ | | | २३६–६–३ |
| मे | १४ | ,, छगनलाल कृष्णराव मुरकुटे, माधवशेट गल्ली, मुंबई २. | ५–०–० |
| ,, | १५ | ,, बाळकृष्ण राघव सावंत परडेकर, मे. वांद्रें | १–५–३ |
| ,, | ,, | ,, संत वकील, जिरापूर | २–०–० |
| ,, | ,, | डॉ. छोटालाल भुलाभाई भट, मुरबाड ठाणें | २५–०–० |
| ,, | ,, | श्री. भवानीशंकर दत्താराम माडगांवकर, गिरगांव | ५–०–० |
| ,, | २३ | ,, राजाराम पांडुरंग मयेकर, मालवण | १–९–० |
| ,, | ,, | ,, के. वाय. प्रधान, जळगांव | ५–०–० |
| ,, | ,, | मे. पिरोजशाह ई. चिनाय, वांद्रें | १–४–० |
| ,, | २६ | डॉ. श्रीपादराव शां. कैकिणी, मियागांव | ६-१२-० |
| ,, | ,, | श्री. रा. आ. तर्खड, वांद्रें | १–४–० |
| ,, | २७ | सौ. निराबाई पवार, कराची | १–१–० |
| जून | १ | कॅप्टन भा. रा. चांदोरकर, धनतोळी | १०–०–० |
| ,, | ३ | श्री. पार्वतीबाई पाटणकर, मुगभाट | ०–४–३ |
| ,, | ,, | ,, यशवंतरावराव जनार्दन गाळवणकर, मे | ५–०–० |
| ,, | ६ | ,, आर. व्ही. पाटणकर, नाशिक | २–८–० |
| ,, | ८ | ,, नारायण नरसिंह फडणीस, जळगांव | ३–०–० |
| ,, | १४ | कॅप्टन वि. गो. हाटे, २२६४ भद्र, अहमदाबाद | ८–०–० |
| ,, | ,, | श्री सी. के. दिवटे, शिरडी | ३–०–० |
| ,, | १६ | ,, बाळकृष्ण रा. सावंत, परडेकर, जून | १–५–३ |
| ,, | १७ | ,, भास्कर चिंतामण मराठे, बेटवा | २–०–० |
| ,, | ,, | कॅप्टन वि. गो. हाटे, क्यांप अजमीर | ९–१–३ |
| ,, | २३ | कॅप्टन भा. रा. चांदोरकर, भंडारा | १०–०–० |
| ,, | २६ | सौ. उमाबाई देव, शिरा मे, जून, | १०–०–० |
| ,, | ,, | ,, ,, ,, पेटी एप्रिल, मे | ४–०–० |
| ,, | ,, | श्री गोखले, महालकरी ठाणें | २–८–० |
| ,, | ,, | ,, वासुदेव नारायण चांदोरकर, कल्याण | २–०–० |
| ,, | ,, | ,, लक्ष्मण महादेव भिडे, भुलुंद | ०–४–३ |
| ,, | २८ | ,, दत्तात्रय शुक्ल, कराची | ५–४–० |
| ,, | ,, | सौ. निराबाई, पवार | १–१–० |
| ,, | ,, | ,, वत्सलाबाई वाक्कर, आरतींतले | ३–११-० |
| ,, | ३० | श्री. रा. आ. तर्खड | ५–०–० |
| ,, | ,, | ,, मोरेश्वर नारायण सत्रे, गांवदेवी | १–०–० |
| ,, | ३ | श्री. यशवंत जनार्दन गाळवणकर जून. | रु. ५–०–० |
| | | | ३७८–८–६ |

१३२

| | | | रु. आ. पै. |
|---|---|---|---|
| | | | ३७८–८–६ |
| जुलै | ,, | दाजी विठ्ठल सांबारे, एप्रिल, मे, जून | ६–०–० |
| ,, | ,, | ,, ,, ,, दक्षिणा | १०–०–० |
| ,, | ४ | ,, आर, व्ही. पाटणकर नाशीक | २–८–० |
| ,, | ५ | ,, आ. ला. आरोळकर, गंताकल जुलै, आ., से. | १०–०–० |
| ,, | ६ | ,, नारायण नरसिंह फडणीस, जळगांव | ३–०–० |
| ,, | ७ | डॉ. हिरालाल आर. क्लार्क, खंभायत, रु. १०० परे होतात. | १५–०–० |
| ,, | ,, | कॅप्टन मा. रा. चांदोरकर, भंडारा | १०–०–० |
| ,, | ,, | श्री. आ. प. ढोळस, ए. मे जून | १–८–० |
| ,, | ११ | डॉ. कांतीलाल आर. क्लार्क, खंभायत | १०–०–० |
| ,, | ,, | श्री. लक्ष्मण बळवंत पुणेकर, बडोदें | ३–०–० |
| जुलै | १६ | ,, बाळकृष्ण आर सावंत. जुलै, वांद्रें | १–५–३ |
| ,, | २५ | सौ. लक्ष्मीबाई लक्ष्मण वालकर, खोचिवडें | १–०–० |
| ,, | ,, | श्री. महादेव पुरुषोत्तम किराणे, सातारा | ५–०–० |
| ,, | ,, | ,, वासुदेव केशव मंत्री, ,, | ५–०–० |
| ,, | ,, | ,, काशीनाथ रा. आंजर्लेकर, पुणें | १–०–० |
| ,, | ,, | ,, गजानन शिवराम पाटणकर, पारनेर | ३२–६–९ |
| ,, | ,, | ,, अनंत विश्वनाथ चित्रें, ठाणें | १०–०–० |
| ,, | २७ | मे. शापुरजी पाळनजी तलाटी, मुंबई | २–०–० |
| ,, | ,, | ,, माणिकशाह हार्मसजी सुखडवाला, धोबीतलाव | १–८–० |
| ,, | ,, | कु. विमल देवी देसाई, बडोदें | ५–०–० |
| ,, | ,, | श्री रा. आ. तर्खड, वांद्रें | ११–०–० |
| ,, | १ | श्री. ए. जे. खेर, सोलापूर | ५–८–० |
| ,, | २ | ,, सेक्रेटरी मराठा प्राव्हिडंट फंड, मुंबई | ५–१४–० |
| ,, | ,, | ,, आर. व्ही. पाटणकर, नाशीक | २–८–० |
| ,, | ३ | ,, नारायण नरसिंह फडणीस, जळगांव | ३–०–० |
| ,, | ४ | ,, यशवंत जनार्दन गाळवणकर, धुळें | ५–०–० |
| ,, | ८ | कॅप्टन मा. रा. चांदोरकर, छिंदवाडा | १०–०–० |
| ,, | ९ | डॉ. वि. गो. हाटे, अजमीर | ६–८–० |
| ,, | ,, | मेजर दौलतसिंग, देवगडकोठी, ग्वाल्हेर | ११–०–० |
| ,, | १० | डॉ. छोटालाल भुलाभाई भट, चिंचणी | ५–०–० |
| ,, | १४ | श्री. बाळकृष्ण राघव सावंत, आगस्ट, वांद्रें | १–५–३ |
| ,, | ,, | सौ. उमाबाई श्रीपाद देव, ठाणें, शिरा, जुलै | ५–०–० |
| | | | ५८४–७–९ |

| १९३२ | | | रु. आ. पै. |
|---|---|---|---|
| | | | ५८४-११-९ |
| आगस्ट ,, | ,, | ,, ,, ,, पेटी जून | २-०-० |
| ,, | ,, | ,, कमळाबाई श्रीनिवास देप ,, शिरा, आगस्ट | ५-०-० |
| ,, | ,, | ,, ,, ,, ,, पेटी जुलै | २-०-० |
| ,, | ,, | श्री. शामराव विनायक रामचंद्र जयकर, पार्ले | ५-०-० |
| ,, | १८ | ,, "न" हस्तें डा. वि. गो. ह्याटे, अजमीर | २-१-० |
| ,, | २१ | ,, गरीब स्वयंपाकी, हस्तें डॉ. छोटालाल शु. भट, सिंचणी | ५-०-० |
| ,, | २३ | डॉ. वामन लक्ष्मण नूलकर, जळगांव | ५-०-० |
| | | | ६१०-८-९ |

---

# श्री भक्तमंडळ खातें

| १९३२. | | | रु. आ. पै. |
|---|---|---|---|
| एप्रिल | १० | मे. डी. एम. राजा, पार्सी कालनी, दादर | १०-०-० |
| ,, | २१ | श्री. विश्वनाथ लक्ष्मण नूलकर, पुणें | ५-०-० |
| ,, | ,, | मे. अबदुल हक्क, प्रोडत्तूर, मद्रास | ५-०-० |
| ,, | ,, | श्री. पुरुषोत्तम गोपाळदास घडियाळी, मुंबई | ५-०-० |
| ,, | ,, | ,, हणमंतराव शिवराम गोंदकर, शिरडी | ५-०-० |
| ,, | ,, | मे. मियासाहेब महमदशाह राजगुरु, सावंतवाडी | ५-०-० |
| ,, | ,, | श्री. बापुसाहेब भैयासाहेब पाटणकर, ,, | ५-०-० |
| ,, | ,, | रा. ब. गजानन रामचंद्र कोठारे, खामगांव | ११-०-० |
| ,, | ,, | श्री. हरिश्चंद्र रामजी मेहो, अंधेरी | ५-०-० |
| ,, | ,, | ,, रामचंद्र सीताराम देव, | ५-०-० |
| ,, | २४ | ,, दत्तात्रय मोरेश्वर सवनीस, पार्ले एकंदर रु. १२५ | ९०-०-० |
| मे | १५ | ,, त्रिंबक विठ्ठल गावड, धार्ते | १०-०-० |
| ,, | २३ | ,, जी. व्ही. प्रधान, मुंबई | ५-०-० |
| जुलै | ११ | कु. शांताबाई मल्हारडकर, मुंबई | ५-०-० |
| ,, | १४ | श्री. आर. एस. वाटवे, अहमदाबाद | ५-०-० |
| ,, | ,, | ,, बी. एन. पंडित, दुरवाड | ५-०-० |
| ,, | २५ | ,, गोविंद लक्ष्मण पांढरे, पुणें | ५-०-० |
| आगस्ट | ८ | ,, हरी बापुराव शिरसाठे, सातारा | ५-०-० |
| | | | १९१-०-० |

# श्रीसाईनाथ

## श्रीज्ञानेश्वर महाराजकृत "अमृतानुभव" व भक्तराज पंडित प्रल्हादबोवा बडवे श्रीक्षेत्र पंढरपुरनिवासी कृत संस्कृत समश्लोकी प्रारंभः

## प्रथम प्रकरण

मू. ओं. ऐशीं इयें निरुपाधिकें । जगाचीं जियें जनकें ।
तियें वंदिलीं मियां मूळिकें । देवो देवी ॥ १ ॥

स. श्लो. **एवं यज्जगती मूलं जनकं निरुपाधिकम् ।**
**शिवशक्त्यात्मकं द्वंद्वं वंदितं तन्मया मुदा ॥ १ ॥**

मू. ओं. जो प्रियुचि प्राणेश्वरी । उलथे आवडीचे सरोभरी ।
चारुस्थळीं एकाहरीं । येकांगीची ॥ २ ॥

स. श्लो. **यः प्रियः स प्रिया भूत्वा प्रीत्या स्वसुखलिप्सया ।**
**चारुस्थल्यामेकपंक्तौ एकांगे संसृतावुभौ ॥ २ ॥**

मू. ओं. आवडीचेनि वेगें । येक येकातें गिळिती अंगें ।
कीं द्वैताचेनि पांगें । उगळिले आहाती ॥ ३ ॥

स. श्लो. **प्रति प्रवाहयोगेन निमीलंतौ परस्परम् ।**
**किंतु द्वैतस्यच व्याजादुद्गीलंतौ न निश्चयः ॥ ३ ॥**

मू. ओं. जें एकचि नव्हे एकसरें । दोघां दोपण नाहीं पुरे ।
काइ नेणों साकारें । स्वरूपें जियें ॥ ४ ॥

स. श्लो. **यदेकं न भवेत्तत्र द्वयोर्द्वित्वं कुतस्तराम् ।**
**साकारौ वा निराकारौ न जानीमः स्वरूपतः ॥ ४ ॥**

मू. ओं. कैसी स्वसुखाची आळुकी । जे दोनीपण मिळोन एकी ।
नेदितीच कवतुकीं । एकपण फुटो ॥ ५ ॥

स. श्लो. कथं स्वसुखलुब्धौ तौ द्वैतभावेन मीलितौ ।
कौतुकेनापि नैकत्वं ददतो स्फुटितं मिथा ॥ ५ ॥

मू. ओं. हा ठावो वरी वियोग भेडे । जें बाळ जगायेवढें ।
वियाली परी न मोडे । दोघुलेपण ॥ ६ ॥

स. श्लो. इत्थं वियोगभीरू तौ सुतौ बालं जगन्प्रियम् ।
अद्यापि द्वैतभावार्थो जगत्यस्मिन्न खंडयते ॥ ६ ॥

मू. ओं. आपुलिये आंगीं संसारा । देखिलिया चराचरा ।
परी नेदितीच तिसरा । झोंक लागों ॥ ७ ॥

स. श्लो. चराचरस्य संसारः स्वांगे संदर्शितः खलु ।
ददतो न तृतीयस्य स्पर्श भावितुमप्यणुम् ॥ ७ ॥

मू. ओं. जया एके सत्तेचे बैसणें । दोघां एका प्रकाशाचें लेणें ।
जे अनादी एकपणें । नांदती दोघे ॥ ८ ॥

स. श्लो. एक सत्ता प्रकाशाभ्यामासनाशनयोर्द्वयोः ।
अनाद्येकत्वभावेन दंपती तौ ननन्दतुः ॥ ८ ॥

मू. ओं. भेदूं लाजोनी आवडी । एक रसीं देत बुडी ।
जो भोगणया थांव काढी । द्वैताचा जेथें ॥ ९ ॥

स. श्लो. निमज्ज्यैकरसे प्रीत्या भेदो ( वै यत्र ) लज्जया ।
बहिः स्वानंद भोगाय द्वैतमादाय निर्ययौ ॥ ९ ॥

मू. ओं. जेणें देवें संपूर्ण देवी । जियेंवीण कांहीं ना तो गोसावी ।
किंबहुना एकोपजीवी । एक एकांची ॥ १० ॥

स. श्लो. देवेन देवी संपूर्णा तांविना स दिगंबरः ।
न किंबहुनैकजीव्यौ दंपती तौ मिथस्तराम् ॥ १० ॥

मू. ओं. कैसा मेळू आला गोडिये । दोघे न माती दार्गी इयें ।
कीं परमाणूहि माजी उवाये । मांडिली आहाती ॥ ११ ॥

स. श्लो. कथं मेलपकः प्रीत्या तयोरासीत्परस्परम् ।
जगंत्रयेन मात्रा यौ विरेजतुरणुष्वपि ॥ ११ ॥

मू. ओं. जिहीं एक एकावीण । न कीजे तृणाचेंही निर्माण ।
जियें दोघे जीवप्राण । जियां दोघां ॥ १२ ॥

स. श्लो. **एकमेकंविना याभ्यां निर्ममे न तृणादिकम् ।**
**प्राणादपिच प्रेयासा वन्योन्यं दंपतीच तौ ॥ १२ ॥**

मू. ओं. घर वातें मोटकी दोघे । जैं गोसावी सेजे रिघे ।
तैं दंपत्यपणें जागे । स्वामीणी जे ॥ १३ ॥

स. श्लो. **गृहकृत्येति निपुणौ यदा स्वपिति पूरुषः ।**
**तदा दांपत्य भावेन जागर्ति गृहिणी स्वयम् ॥ १३ ॥**

मू. ओं. जिया दोघांनाजि येकादें । विपार्यें उमळलें होय निदें ।
तरी घरवात गिळूनि न सुयें । कांहीं ना करी ॥ १४ ॥

स. श्लो. **ययोर्द्वयोरेकतरं निद्रितं यदि जागृयात् ।**
**ग्रसित्वा सग्रहं सर्वं न किंचिदवशिष्यते ॥ १४ ॥**

मू. ओं. दोहीं आंगाची आटणी । गिंवसित आहाती एकपणीं ।
जाली भेदाचिया वाहणी । आधार्धीं जिये ॥ १५ ॥

स. श्लो. **विलप्यांगं द्वयं द्वाभ्या मेकभावेन संस्थितम् ।**
**पुनरर्ध विभागेन भेदवंतौ वभूवतुः ॥ १५ ॥**

मू. ओं. विषो एक येकांचीं जियें । जियें येकयेकांची विपयीं द्वयें ।
जिहीं दोघीं सुखियें । जियें दोघे ॥ १६ ॥

स. श्लो. **आश्रयश्चैकमेकस्य विषयश्च परस्परम् ।**
**अन्योंन्यं सुखिनौ तद्वदन्योन्याभ्यांनिरंतरम् ॥ १६ ॥**

मू. ओं. स्त्री-पुरुष नामभेदें । शिवपण एकलें नांदे ।
जग सगळें अधार्धं- । पणें जिहीं ॥ १७ ॥

स. श्लो. **स्त्रीपुन्नामत्वभेदेन नंदत्येको शिवः स्वयम् ।**
**ययोरर्ध विभागेन भाति वै सकलं जगत् ॥ १७ ॥**

मू. ओं. दो दांडीं एक श्रुती । दोहीं फुलीं एक दृती ।
दोहीं दिवीं दीसी । एकीचि जेवीं ॥ १८ ॥

स. श्लो. **युग्मदंडे श्रुतिश्चैका सुगंधः सुमनद्वये ।**
**दीपद्वये यथैवैका दीप्तिः संराजते तराम् ॥ १८ ॥**

मू. ओं. दों ओंठीं एकी गोष्टी । दों डोळां एकी दिठी ।
तेवीं दोघी जिहीं सृष्टी । एकीचि जे ॥ १९ ॥

स. श्लो. ओष्ठद्वये यथैवैका गोष्टिर्दष्टिश्च नेत्रयोः ।
द्वाभ्यां तथा जीवसृष्टिरेकैवेति श्रुतिर्जगौ ॥ १९ ॥

मू. ओं. दाऊनि दोनीपण । एकरसाचें आरोगण ।
करीत आहे मेहूण । अनादि जे ॥ २० ॥

स. श्लो. अनादि मिथुनं चैतत्प्रकृतिप्रत्ययात्मकम् ।
एकत्रैकरसं भुंक्ते द्वैतं तत् दृश्यमात्मनः ॥ २० ॥

मू. ओं. जे स्वामीच्रिया सत्ता–। वीण असो नेणे पतिव्रता ।
जियेवीण सर्व कर्ता । कांहीं ना जो ॥ २१ ॥

स. श्लो. स्वामिसत्तां विना स्थातुं न शक्नोति पतिव्रता ।
यां विना सर्वकर्तापि नैव किंचित्करोति सः ॥ २१ ॥

मू. ओं. जे कीं भातारांचें दिसणें । भतारूचि जियेचें असणें ।
नेणिजती दोवेजणें । निवडूं जिये ॥ २२ ॥

स. श्लो. भर्तुर्यद्दर्शनं यस्या भर्ताचैवासनं किल ।
न ज्ञायते च यद्द्वंद्वं निर्गुणे तत्स्वरूपतः ॥ २२ ॥

मू. ओं. गोडी आणि गुळु । कापूर आणि परिमळु ।
निवडु जातां पांगुळु । निवाडु होय ॥ २३ ॥

स. श्लो. यथा गुडस्तस्य स्वादः कर्पूरस्तस्य सौरभम् ।
पृथक्त्वेन विनिर्णेतुं विवेकः पंगुतां व्रजेत् ॥ २३ ॥

मू. ओं. समग्र दीप्ती घेतां । जेवी दीपचि ये हातां ।
तेवी जियेचिया तत्वतां । शिवूचि लाभे ॥ २४ ॥

स. श्लो. "कृत्स्न दीप्तिग्रहेणापि दीपं संगृह्यते यथा ।"
तथा यस्या ग्रहेणापि शिवं प्राप्नोति तत्वतः ॥ २४ ॥

**( पंडितकृत श्लोक मिळाला नसल्यामुळें श्री. देवांनीं २४ वा श्लोक नवीन करून घातला आहे. )**

मू. ओं. जैसी सूर्यी मिरवे प्रभा । प्रभे सूर्यत्वचि गाभा ।
तैसी भेद गिळित शोभा । येकचि जे ॥ २५ ॥

स. श्लो. **प्रभया राजितः सूर्यो प्रभा गर्भगतो रविः ।**
**तद्वत् भेदं ग्रसित्वा तु प्रभैवैका विराजते ॥ २५ ॥**

मू. ओं. कीं बिंब प्रतिबिंबा द्योतक । प्रतिबिंब बिंबा अनुमापक ।
तैसें द्वैत मिसें एक । बरवतसे ॥ २६ ॥

स. श्लो. **द्वैतकं प्रतिबिंबस्य बिंबं बिंबानुमापकम् ।**
**प्रतिबिंबं तथाद्वैत व्याजेनैकं विराजते ॥ २६ ॥**

मू. ओं. सर्व शून्याचा निष्कर्षु । जिया बाइला केला पुरुषु ।
जेणे दादुलेन सत्ता विशेषु । शक्ती झाली ॥ २७ ॥

स. श्लो. **सर्व शून्यस्य निष्कर्षः स कृतः पुरुषो यया ।**
**येन भर्त्रा स्वसत्तायाः विशेषः शक्तिरुत्कृता ॥ २७ ॥**

मू. ओं. जिये प्राणेश्वरो वीण । शिवीं ही शिवपण ।
थारों न शके तें आपण । शिवें घडली ॥ २८ ॥

स. श्लो. **न शक्नोति शिवे स्थातुं शिवत्वं यां प्रियांविना ।**
**शिवात्मता शिवेनैव घटिताहि स्वलीलया ॥ २८ ॥**

मू. ओं. ऐश्वर्येशीं ईश्वरा । जियेचें अंग संसारा ।
आपण, होउनि उभारा ॥ आपणचि जे ॥ २९ ॥

स. श्लो. **ऐश्वर्येण सहेशस्य सृष्टिः स्वांगैः कृता यया ।**
**स्वकीयस्योद्भवस्यापि या हेतुः स्वयमेव हि ॥ २९ ॥**

मू. ओं. पतीचेनि अरूपपणें । लाजोनि अंगाचें मिरवणें ।
केलें जगा येवढें लेणें । नामरूपाचें ॥ ३० ॥

स. श्लो. **अरूपं स्वपतिं वीक्ष्य भूत्वा प्रत्यङ् मुखी हिता ।**
**अलंचक्रे जगन्मय्यै नामरूपादि भूषणैः ॥ ३० ॥**

मू. ओं. ऐक्याचा हो दुकाळा । बहुपणाचा सोहळा ।
जिये सदैवचि ये लीळा । दाखविला ॥ ३१ ॥

स. श्लो. यत्रैवैकस्य दुष्कालः तत्र बाहुल्य संभ्रमः ।
यास्ति भाग्यवती तस्याः लीलया तस्य दर्शितः ॥ ३१ ॥

मू. ओं. आंगाचिया आटणिया । कांतु उवाया आणिला जिया ।
स्वसंकोचे प्रिया । रूढविली जेणें ॥ ३२ ॥

स. श्लो. स्वांगस्यैवोपसंहृत्य यया कांतः प्रदर्शितः ।
येन कृत्वा स्वसंकोचं प्रियैवाये प्ररूढिता॥ ३२ ॥

मू. ओं. जियेते पहावयाचिया लोभा । चढे द्रष्टत्वाचिया क्षोभा ।
जियेते न देखतुचि उभा । आंगचि सांडी ॥ ३३ ॥

स. श्लो. स्वप्रियां द्रष्टुकामेन साक्षित्वं येन स्वीकृतम् ।
तदभावेन द्रष्टत्वं लीयते च स्वभावतः ॥ ३३ ॥

मू. ओं. कांतेचिया भिडा । अंतुला होये जगायेवढा ।
आंगविला उघडा । जियेवीण ॥ ३४ ॥

स. श्लो. कांतामर्यादया नूनं संजातो यो जगन्मितः ।
तत्वेनालोचिते यस्मिन्न भावो नामरूपयोः ॥ ३४ ॥

मू. ओं. जो हा ठावो मंदरूपें । उवाइलेंपणें हारपे ।
जो जाला जियेचेनि पडपें । विश्वरूप ॥ ३५ ॥

स. श्लो. एतावन्मंदरूपेण विस्तृतः सन् विलुप्यते ।
यस्या विभवतो जातः स एवं विश्वरूपतः ॥ ३५ ॥

मू. ओं. जिया चेवविला शिवू । वेघाचें वोणें बहु ।
वाढिते नशी जेऊं । घाला जो ॥ ३६ ॥

स. श्लो. इया भोजयितो भर्ता त्रियान्नं बहुलंच तत् ।
भोजयित्री तया सार्धं भुक्त्वान्नं यः स मातृवत् ॥ ३६ ॥

मू. ओं. निदैलेंनि भातारें । जें वियें चराचरें ।
जियेचा विसंबला नुरे । आंबुलेपण ही ॥ ३७ ॥

स. श्लो. निद्रिते भर्तरि स्वीये या प्रसूते चराचरम् ।
यस्यां विश्रम्यमाणायां पुरुषत्वं विलुंपति ॥ ३७ ॥

मू. ओं. जंव कांत लपो बैसे । तव नेणिजे जिया दोघें ।
जिये दोघे आरिसे । जिया दोघां ॥ ३८ ॥

स. श्लो. यदा कांतो लोलुभिच्छेत् तद्दशां दर्शितो हि सः ।
तावुभावुभयोर्यस्मादर्शकौ मुकुरौ समौ ॥ ३८ ॥

मू. ओं. जियेचेनि अंगलगे । आनंद आपणा आरोगूं लागे ।
सर्व भोक्तृत्वही नेघे । जियेवीण कांहीं ॥ ३९ ॥

स. श्लो. स्वादत्यात्मानमानंदो यस्या एवांगसंगतः ।
सर्व भोक्ताप्यगृण्हाति यत्किंचिदपि यां विना ॥ ३९ ॥

मू. ओं. जया प्रियाचें जें अंग । जो प्रियुचि जियेचें चांग ।
कालवूनि दोन्ही भाग । जेविते आहृति ॥ ४० ॥

स. श्लो. या धै यस्य प्रियस्यांगं यस्याः सौभाग्यकं प्रियः ।
कालयित्वा द्वय भागं जेमंतौ तावुभावपि ॥ ४० ॥

मू. ओं. जैसी कां समीरें सकटगती । कां सोनियासकट कांती ।
तैसी शिवेशीं शक्ती । अवघीच जे ॥ ४१ ॥

स. श्लो. यथा गतिः समीरेण सहित्वा तत्स्वरूपिणी ।
कांतिः स्वर्णात्मिका तद्वत् शिवेन सकला शिवा ॥ ४१ ॥

मू. ओं. कां कस्तूरीसकट परिमळु । कां उष्मेसगट अनळु ।
तैसा शक्तीशीं केवळु । श्री शिवूची जो ॥ ४२ ॥

स. श्लो. गंधात्मिकैव कस्तूरी उष्मणा सहितोऽनलः ।
तथा शक्तिस्वरूपेण भाति वै सकलः शिवः ॥ ४२ ॥

मू. ओं. राती आणि दिवो । पातली सूर्याचा टावो ।
तैसा आपुलिया साचि वावो । दोघे जिये ॥ ४३ ॥

स. श्लो. अह्नो रात्रं स्वरूपेण मृषा स्यात्सूर्यसंगतम् ।
तथा सत्यस्वरूपे स्वे मिथ्या भूतावुभावपि ॥ ४३ ॥

मू. ओं. किंबहुना तिये । प्राणवाक्षरीं विरूढ तिये ।
दशेचीही वैरिये । शिवशक्ती ॥ ४४ ॥

स. श्लो. बहुनोक्तेन किं तौ द्वौ शब्द मात्र स्वरूपकौ ।
प्रणवाक्षर रूढाया दशा तस्यास्तु वैरिणौ ॥ ४४ ॥

मू. ओं. हें असो नाम रूपाचा भेद किरा। गिळित एकार्थाचा उजिरा।
नमो तया शिवशक्ति वोहरा। ज्ञान देवो म्हणे ॥ ४५ ॥

स. श्लो. **पूर्वोक्तं तत्तथैवास्तु उभयोरेकतापि-वा।**
**नमस्तस्मै गुणातीत-पुरुषाय स्वरूपिणे ॥ ४५ ॥**

मू. ओं. जयां दोघांच्या अलिंगनीं। विरोनि गेली दोनी।
आघवियाचि रजनी। दिठीच जे ॥ ४६ ॥

स. श्लो. **ययोरालिंगने चोभौ विशीर्णौ स्वस्वरूपताम् ॥**
**रजन्यामागता यांतु दृष्टिः शीर्णा यथा भवेत् ॥ ४६ ॥**

मू. ओं. जयाच्या रूप निर्धारीं। गेली परेशी वैखरी।
सिंधूसी प्रलयनीरीं। गंगा जैसी ॥ ४७ ॥

स. श्लो. **ययोः स्वरूप निर्धारे सपरा वैखरी गता।**
**सिंधुना सहिता गंगा निमग्ना प्रलयांबुनि ॥ ४७ ॥**

मू. ओं. वायू चलबळेंशी। जिराला व्योमाचिये कुशीं।
आटला प्रलय प्रकाशीं। सप्रभ भानु ॥ ४८ ॥

स. श्लो. **चांचल्य सहितो वायु र्जीर्णो व्योमोदरे यथा।**
**यथा या सप्रभो भानु र्लुप्तः प्रलय तेजसि ॥ ४८ ॥**

मू. ओं. तेवि निहाळितां ययातें। गेलें पाहणेनिशीं पाहतें।
पुढती घरौते वरौते। वंदिली तिये ॥ ४९ ॥

स. श्लो. **ययो रालोचनं तादृक् सकृद्दर्शनकं गतम्।**
**भूयस्तौ दंपती साक्षान्नतौ विश्वकुटुंबिनौ ॥ ४९ ॥**

मू. ओं. जयाच्या वाहणी। वेदुक वेद्याचे पाणी।
न पिये पण सांडणी। अंगाची ही करी ॥ ५० ॥

स. श्लो. **ययोः प्रवाह उदकं वेद्यं नो वेदकः पिबेत्।**
**नेदं कुतूहलं किंतु निजांगं त्यजति क्षणात् ॥ ५० ॥**

मू. ओं. तेथ मी नमस्कारा-। लागी उरो दुसरा।
तर्‍हीं लिंग भेद पऱ्हा। जोडूं जावो ॥ ५१ ॥

स. श्लो. **तत्राहं नमनं कर्तुं यदि शिष्येत् द्वितीयकः।**
**तदा परो लिंग भेदस्त्वेतस्मादधिकोऽस्ति किम् ॥ ५१ ॥**

मू. ओं. परी सोने नसे कुजे । नव्हतु लेणें सोनया भजे ।
हें नमन करणें माझें । तैसें आहे ॥ ५२ ॥

स. श्लो. **हिरण्मयं हिरण्यं हि यथा भिन्नतया भजेत् ।**
**इदमपि तथैवास्ति सर्वथा वंदनं मम ॥ ५२ ॥**

मू. ओं. सांगतां वाचे ते वाचा । ठावो वाच्य वाचकता ।
पडता काय भेदाचा । विटाळु होये ॥ ५३ ॥

स. श्लो. **वाच्यैव वाच्यमानायां वाचायामेतयोर्द्वयोः ।**
**वाच्य वाचकयोर्भेदस्पर्शोऽस्ति किं तयोर्वद ॥ ५३ ॥**

मू. ओं. सिंधु आणिं गंगेची मिळणी । स्त्रीपुरुषनामाचीं लेणीं ।
दिसती तरी पाणी । काय द्वैत होईल ॥ ५४ ॥

स. श्लो. **स्त्रीपुंनामप्रभेदेन गंगा-सागर-संगतिः ।**
**संविभाति तथाप्यस्ति पानीये द्वैतता किमु ॥ ५४ ॥**

मू. ओं. पाहा पां भास्य भासकता । आपुलिये ठायीं दाविता ।
एकपणा काय सविता । मोडत असे ॥ ५५ ॥

स. श्लो. **भास्यभासकता द्वैतं स्वस्मिन्संदर्शयन् रविः ।**
**तथापि सवितुस्तस्य किमेकत्वं विभिद्यते ॥ ५५ ॥**

मू. ओं. चंद्राचिया दोंदावरी । होतां चांदणियांची विखुरी ।
काय उणीव ये दीप्तिवरी । न गिंवसे दीपु ॥ ५६ ॥

स. श्लो. **चंद्रोपरि भवेयद्वच्चंद्रिकाया विकीर्णता ।**
**दीप्तिविनोपलब्धिस्यात्किमुद्दोपस्य कुत्रचित् ॥ ५६ ॥**

मू. ओं. मोतियाची कीळ । होत मोतियावरी पांगुळ ।
आगळे जें निर्मळ । रूपा ये कीं ॥ ५७ ॥

स. श्लो. **मौक्तिकस्य प्रभा यद्वन्मुक्तोपरि समुल्लसेत् ।**
**अधिकं निर्मलत्वेन । भ्राजते मौक्तिकंतया ॥ ५७ ॥**

मू. ओं. आणि मात्राचिया त्रिपुटीया । काय प्रणउ केला चिरटिया ।
किं णकार तिरेघटिया । भेदतु आहे ॥ ५८ ॥

स. श्लो. **मात्राभिस्तिसृभिर्भिन्नो भिन्नाभिः प्रणवः किमु ।**
**रेखाभिस्तिसृभिः किंवा णकारे भेदमाप्नुयात् ॥ ५८ ॥**

मू. ओं. अहो ऐक्याचें मुदल न ढळे। वरी साजिरेपणाचा लाभ मिळे।
तरी स्वतरंगचि मुकुले। तुरंबु कां ना पाणी ॥ ५९ ॥

स. श्लो. **नचलेदैक्यमूलंचेत्स्वसुशोभाधिका भवेत्।**
**निजोर्मिमुकुलान्कस्मात्तदाकं नावतंसतु ॥ ५९ ॥**

मू. ओं. म्हणोनि भूतेशु आणि भवानी। वंदिलीं न करोनि सिनानि।
मी रिघालों नगनी। तें ही तेंगें ॥ ६० ॥

स. श्लो. **एवं भवानी भूतेशौ यावभिन्नाविनादितः।**
**प्रवृत्तो हं नमस्कर्तुं अकृत्वा भिन्न भावनाम् ॥ ६० ॥**

मू. ओं. जैसें दर्पणाचेनि त्यागें। प्रतिबिंब बिंबीं रिघे।
कां बुडी दिजे तरंगें। वायुना ठेला ॥ ६१ ॥

स. श्लो. **प्रतिबिंबं विशेद्विंबे दर्पणत्यागमात्रतः।**
**रुद्धं वायौ तरंगेण यथांभसि विलीयते ॥ ६१ ॥**

मू. ओं. कां नीद जातखेवों। पावे आपणपे आपुला ठावो।
तैसी बुद्धि त्यागें देवीं देवो। वंदिलीं मियां ॥ ६२ ॥

स. श्लो. **आत्मा स्वस्थानमाप्नोति प्राप्त निद्रस्तुतत्क्षणे।**
**तद्वन्मया मतित्यागाद्देवीदेवौ नमस्कृतौ ॥ ६२ ॥**

मू. ओं. सांडूनि मीठपणाचा लोभु। मिठें सिंधुत्वाचा घेतला लाभु।
तैसा अहं दवडूनि मी शंभु। शांभवी आलों ॥ ६३ ॥

स. श्लो. **त्यक्तलोभमहंतायाः सैंधवं सिंधुतामियात्।**
**तथैवाहं मतेस्त्यागादभवं सांब शंभुसाक् ॥ ६३ ॥**

मू. ओं. शिवशक्ति समावेशें। म्यां नमन केलें ऐसें।
रंभागर्भ आकाशें। रिघाला जैसा ॥ ६४ ॥

स. श्लो. **रंभागर्भो यथाकाशे प्रविष्टो गां दशामियात्।**
**शिवशक्तिसमावेशान्मयातद्वन्नमस्कृतम् ॥ ६४ ॥**

**इतिश्रीज्ञानदेवविरचिते अमृतानुभवराजयोगेप्रकृतिपुरुष वंदनं नाम प्रथमं प्रकरणम् ॥ १ ॥ श्रीरस्तु ॥ इतिश्रीप्रज्ञाचक्षुकृतायां अमृतानुभव समश्लोक्यां ऐक्यभावेन प्रकृतिपुरुषनमनं नाम प्रथमं प्रकरणम् ॥ १ ॥**

# वर्गणीदारांकरितां

१ श्रीसाईलीलेचा वर्षारंभ चैत्र महिन्याचे अंकापासून आहे. नवीन वर्गणीदारांस वर्षारंभापासून अंक घ्यावे लागतील.

२ पत्ता बदलणें झाल्यास लगेच आम्हांस कळवावें. बदललेला पत्ता न कळविल्यामुळें कित्येक वेळां अंक गहाळ होतात.

३ अंकासंबंधी पत्रव्यवहार आमचेकडे करावा.

४ लेखासंबंधी पत्रव्यवहार संपादक व प्रकाशकांकडे करावा.

# वार्षिक वर्गणी.

वार्षिक वर्गणी टपाल खर्चासह मनिऑर्डरनें आगाऊ रु. ३।=, व्ही. पी. नें रु. ३॥, फुटकळ अंक ।=, मागील अंकास शिल्लक असल्यास -॥-

व्यवस्थापक—**श्रीसाईलीला.**

# लेखकांकरितां

१. श्रीसाईलीलेंत प्रसिद्धीसाठी पाठविलेला लेख अथवा कविता कागदाच्या एका बाजूवर, मार्जिन सोडून, सुवाच्य बाळबोध लिपींत असावीं. पेन्सिलीनें किंवा कागदाचे दोन्हीं बाजूस लिहिलेला मजकूर छापण्यास फार त्रास पडतो.

२. लिखाणासोबत पूर्ण नांव व पत्ता दिला पाहिजे. नांव प्रसिद्ध न करितां टोपण नांवाखालीं प्रसिद्धि द्यावयाची असल्यास त्याप्रमाणें कळवावें.

३. लेख अथवा कविता हातीं आल्यानंतर १ महिन्यांत पसंति अगर नापसंति कळविली जाईल. पसंति कळविल्यानंतर, आम्हांला कळविल्याशिवाय लेखकांनीं तो मजकूर दुसरीकडे छापविण्यास देऊं नये.

४. लेखांत योग्य तो फेरफार करण्याचा अधिकार आम्हांकडे राहील. येईल तसा शब्दशः प्रसिद्ध करण्याची हमी आम्हीं घेत नाहीं.

५. लेखासोबत पुरेसें पोस्टेज आल्यास, नापसंत लेख परत करूं.

प्रकाशक—**श्रीसाईलीला.**

"दक्षिणा प्राइझ कमिटीनें बक्षिस दिलेला व केसरी, चित्रमयजगत्, ज्ञानप्रकाश, विविधज्ञानविस्तार, व रत्नाकर वगैरे वृत्तपत्रें व मासिकांनी उत्कृष्ट अभिप्राय दिलेला असा संतकवि ह. भ. प. श्री दासगणू महाराज ह्यांनी नवीन रचिलेला व प्रोफेसर श्री. नी. चाफेकर, M. A., LL. B. ह्यांनीं प्रस्तावना लिहिलेला नवीन ग्रंथ

**श्री पासष्टी–भावार्थ दीपिका**

हा **नरेंद्र बुक डेपो दादर**, मुंबई येथें मिळेल.

**कापडी प्रत १० आणे.**　　**साधी प्रत ८ आणे.**

सर्व प्रकारचे मेंदूचे विकारांवर जागरण व मानसिक श्रम करणाऱ्यांस अत्यंत उपयोगी

नकलेबद्दल ) **ब्राह्मी तेल** ( सावध रहावें.

**बाळबाळंतिणीकरितां औषधें**

**बाळंत काढा नं. १** पहिल्या दहा दिवसांचा ०।४; **बाळंत काढा नं. २** दहा दिवसानंतर ०।४; **बाळकडू**:—मूल जन्मल्यापासून देण्यास योग्य ०।८; **कुमारी आसव** लहान मुलांकरितां ०।१२.

**सतत २५ वर्षें लोकादरास पात्र झालेलें, कोणत्याही ऋतूंत घेण्यास योग्य, अत्यंत मधुर व आरोग्यदायक**

एक रत्तल १।०।०　दीड रत्तल २।०।४　) **द्राक्षासव** (　अर्धी रत्तल ०।१४　ट. ख. वे. नि.

शिवाय आमचे कारखान्यांत टिकाऊ तयार काढे, आसवें, अरिष्टें, भस्में वगैरे ५०० वर औषधें तयार आहेत. त्यांचे माहितीचा मोठा क्याटलाग व प्रकृतिमान भरून पाठविण्याकरितां "रुग्ण–पत्रिका" हीं सात आण्यांचीं तिकिटें आलीं असतां पाठवूं.

**दत्तात्रय कृष्ण सांडू ब्रदर्स** आर्यौषधी कारखाना, चेंबूर जि. ठाणें.

टे. नं. ८७०२४ X २२२७८. दुकान दवाखाना, ठाकुरद्वार, **मुंबई** नं० २

पुणें:—**श्री साईनाथ** आणि **कंपनी**.

हें पुस्तक श्रीलक्ष्मीनारायण छापखाना, ३६४ ठाकुरद्वार, मुंबई येथें अनंत आत्माराम मोरमकर यांनीं छापून रा. आ. तर्खड यांनीं ५ सेंट मार्टिन्स रोड, वांद्रें येथें प्रसिद्ध केलें.